| | |
|---|---|
| MHAH080001452014 | **नियमित दिवाणी दावा क्र. १९९/१९९५ मधील निशाणी क्र.३२० वर आदेश.**<br>(लक्ष्मण रभाजी वाघ<br>**विरुध्द**<br>रंगनाथ रभाजी वाघ व इतर) |

प्रतिवादी क्र. १क व १ड यांनी सदरचा अर्ज दावा मिळकतीची पाहणी करून दावा मिळकतीपैकी कोणते व किती क्षेत्र दाव्यातील कोणत्या पक्षकारास मोजणी होवुन हद्दीच्या खुणा निश्चित करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्यात यावी याकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे :– वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरूद्ध वाटपासाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केला असुन त्यामध्ये हुकुमनामा घेऊन त्या हुकुमनाम्या विरूद्ध प्रतिवादी क्र. ०१ यांनी अपील दाखल केले त्यामध्ये दावा पुन्हा फेर चौकशीसाठी पाठविलेला असून त्याप्रमाणे सदर दाव्याचे कामकाज चालू आहे. वादीने सदर दाव्यात कथन केल्याप्रमाणे दावा मिळकत प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांचे कब्जे वहीवाटीला असून वादी मोल मजुरी करीत असल्याचे कथन केलेले आहे. दावा मिळकतीचे वाटपाचा हुकुमनाम्याप्रमाणे १/४ हिस्याने दावा मिळकतीपैकी गट नं. १५७ चे वादी व त्यांचे कुटुंबीय यांच्या हिस्याला क्षेत्र ०२ हे ०.१ आर हे अनिल लक्ष्मण वाघ, बाळासाहेब लक्ष्मण वाघ व लक्ष्मण रभाजी वाघ यांचे कब्जे वहिवाटीला असून गट क्र. १०३ चे क्षेत्र ०१ हे. हे गोरख लक्ष्मण वाघ व त्यांची आई साखराबाई लक्ष्मण वाघ यांचे प्रत्यक्ष वहीवाटीला आहे.

**०३.** प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, सदर मिळकतीमधून ते

चांगल्याप्रकारे उत्पन्न घेत आहेत असे असतानाही वादी हे वेळोवेळी न्यायालयाची दिशाभूल करून मोल मजुरी करीत असल्याचे नमुद करीत आहे. सदरची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. म्हणून कोर्ट कमिशनरची नेमणूक करून वादी, प्रतिवादी चे कब्जे वहीवाटीला असलेल्या मिळकतींची वस्तुस्थिती पाहून त्याप्रमाणे अहवाल व कच्चा हातनकाशा न्यायालयात दाखल करणेसाठी उपअधिक्षक भुमि अभिलेख संगमनेर यांना आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.३३४ वर सादर करुन असे कथन केले आहे की, वादीला त्याचा दावा मिळकतीतील असणारा १/४ हिस्सा कधी व कोणत्या तारखेला व कोणत्या फेरफाराने दिला यांचा उल्लेख अर्जात नाही. गट नं. १५७/१ व गट नं. १०३ चे कोणतेही ७/१२ उतारे प्रतिवादीने अर्जासोबत दाखल केलेले नाही. याउलट प्रतिवादींनी सदर दावा निकाली झाल्यानंतर त्याविरुध्द अपील दाखल करुन प्राथमिक हुकुमनाम्याच्या अंमल बजावणीसाठी दाखल केलेली दरखास्त कामकाज स्थगित केले आहे. त्यानंतर अपिलातील आदेशानुसार दावा Remand Back झाल्यानंतर प्रतिवादी यांनी बेकायदेशिररित्या दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यात परस्पर वाटप करुन तशी नोंद करुन घेतली आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादीच्या ताब्यात किती मिळकत आहे याचा उल्लेख प्रतिवादीने केलेला नाही. याउलट रे.अ.नं. १७/२००२ मधील निकालामध्ये प्रतिवादी क्र. १ कडे मोठ्या प्रमाणात जमिन आहे, असा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच, दाव्यात मनाई हुकुम असतांना प्रतिवादींनी दावा मिळकतीचे हस्तांतरण थांबविलेले नाही. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांचा पुरावा चालु आहे अशा वेळी प्रतिवादींना कमिशनचा अर्ज देता येणार नाही व त्यामार्फत

पुरावा गोळा करता येणार नाही, असे कथन करुन प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** वादी व प्रतिवादींतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वादीने दाव्यामध्ये वादी मोलमजुरी करत असल्याचे कथन केले आहे. परंतु, सदर दाव्यात दावा पुन्हा फैलावर घेण्यापुर्वी झालेल्या प्राथमिक हुकुमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीपैकी गट क्र. १५७ मधील वादी व त्यांच्या कुटुंबियांच्या हिश्याला आलेले २ हे. ०.१ आर हे क्षेत्र अनिल वाघ, बाळासाहेब वाघ व लक्ष्मण वाघ यांच्या कब्जेवहिवाटिस असुन गट क्र. १०३ चे १ हे. क्षेत्र गोरख वाघ व त्यांची आई साखराबाई वाघ यांच्या प्रत्यक्ष वहिवाटीला आहे व त्यामधुन ते उत्पन्न घेत असतांना वादी मोलमजुरी करत असल्याचे चुकीचे कथन वादीने नमुद केले आहे. त्यामुळे दावा मिळकतीपैकी किती व कोणती मिळकत कोणाच्या वहिवाटीला आहे ही वस्तुस्थिती समोर येण्यासाठी आयोगाची नेमणुक करण्याची प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विनंती करण्यात आली आहे. याउलट वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वादीच्या ताब्यात १/४ हिस्सा कधीही मिळालेला नसुन प्रतिवादी यांनी दावा मिळकत वेळोवेळी हस्तांतरीत करुन तसेच, दावा मिळकतीतुन उत्पन्न घेऊन वादीचा हक्क डावललेला आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीचे आपसात वाटप करुन तशी चुकीची नोंद केलेली आहे असा युक्तिवाद करुन प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०६.** अभिलेखावरुन सदर दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी व जाहीर ठराव मिळण्यासाठी दाखल केल्याचे दिसुन येते. परंतु, अशा

परिस्थितीमध्ये वादीने स्वतःचे वादकथन पुराव्याने शाबीत करण्याचा पुराव्याचा भार वादीवर असुन सदर वाद कथन खोडुन काढण्याची प्राथमिक जबाबदारी व पुराव्याचा भार प्रतिवादींवर आहे. सदर अर्जातुन प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादकथनानुसार वादी मोलमजुरी करत नसुन दावा मिळकतीपैकी अर्जात नमुद क्षेत्र वादीच्या कब्जेवहिवाटीत असुन वादी त्यापासुन उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे दावा मिळकतीपैकी किती क्षेत्र नेमके कोणाच्या ताब्यात आहे, ही वस्तुस्थिती दर्शविण्यासाठी आयोगाची नेमणुक करावी.

**०७.** याठिकाणी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २६ मधील तरतुदीचे अवलोकन करणे आवश्यक ठरते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २६ नियम ९ प्रमाणे ज्या दाव्यामध्ये एखादी बाब वादग्रस्त असेल, ज्यासाठी स्थानिक अन्वेषण करणे आवश्यक असेल व तसे स्थानिक अन्वेषण केल्याशिवाय अभिलेखावर आलेल्या पुराव्यातील वादग्रस्त किंवा दुविधा परिस्थिती स्पष्ट होवु शकणार नाही अशी परिस्थिती असेल तर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २६ नियम ९ प्रमाणे स्थानिक अन्वेषणासाठी आयोग स्थापन करुन आयोग पत्र जारी करता येते. परंतु, प्रस्तुत दाव्यामध्ये वादग्रस्त व न्यायप्रविष्ठ असलेल्या मुद्यामध्ये दावा मिळकत कोणाच्या कब्जेवहिवाटीत आहे याबद्दल कोणताही मुद्दा उपस्थित नसुन सदर दावा वाटपाचा असल्याने दावा मिळकतीवरील कब्जा हा प्राथमिक किंवा वादाचा मुद्दा नाही. तसेच, सदर मुद्याबाबत अभिलेखावरील पुराव्यात दुविधा परिस्थिती असुन आयोगामार्फत स्थानिक अन्वेषण झाल्याशिवाय सदर बाब स्पष्ट होणार नाही अशी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये या टप्प्यावर दावा मिळकतीचा कब्जा कोणाचा, कसा व किती आहे हे

स्पष्ट करण्यासाठी स्थानिक अन्वेषणासाठी आयोगाची स्थापना करण्याची कोणतीही आवश्यकता दिसुन येत नाही. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ३ चा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहेः

| **-आदेश-** |
|---|
| अर्ज नि.३२० नामंजुर करण्यात येत आहे. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.11.20 17:56:58 +0530

संगमनेर. (श्रीमती एस. बी. ढवळे)
दिनांक :- २०/११/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
संगमनेर.